प्रेसनोट दि. 01/10/2026

| अ.क्र | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | घटक | पुणे घटक |
| 2 | तक्रारदार | पुरुष, वय 59 वर्षे |
| 3 | आरोपी | श्री सतीश नाथाराव मुंढे, वय 45 वर्ष, पद- पोलिस हवालदार, नेमणूक- शिरुर पोलीस ठाणे, वर्ग 3 |
| 4 | तक्रार | यातील तक्रारदार व त्यांचे कुटुंबीयांच्या विरोधात शिरूर पोलिस स्टेशन येथे बीएनएस कलम 126(2), 303(2),324(4) ,3(5) अन्वये गुन्हा नोंद आहे. दाखल गुन्ह्याचा तपास हा शिरूर पोलिस स्टेशन च्या पोलीस हवालदार सतीश मुंढे यांच्याकडे आहे. दाखल गुन्ह्यांमध्ये तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांना अटक न करण्यासाठी व गुन्ह्यामध्ये मदत करण्यासाठी लोकसेवक मुंढे यांनी तक्रारदार यांना 1,00,000/- (एक लाख) रुपये लाच मागणी केली. याबाबत दिनांक 30/09/2026 रोजी लाप्रवि, पुणे येथे तक्रारदार प्राप्त झाली. |
| 5 | तक्रारीची पडताळणी | प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 30/09/2026 रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान पंचासमक्ष आलोसे श्री सतीश मुंढे पोलिस हवालदार यांनी शिरूर पोलिस स्टेशन अंतर्गत टाकळी हाजी पोलीस चौकी येथे तक्रारदार यांना बोलावून तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांना त्यांच्या विरोधात दाखल गुन्ह्यामध्ये अटक न करता मदत करण्यासाठी तक्रारदाराकडे स्वतःसाठी व वरिष्ठांच्या नावाने सुरुवातीस 1,00,000/- व नंतर तडजोडीअंती 95000/- रुपयांची लाच मागणी केली. |
| 6 | सापळा कार्यवाही | लाच मागणीच्या अनुषंगाने दिनांक 30/09/2026 रोजी टाकळी हाजी पोलीस चौकी येथे करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान पंचासमक्ष आरोपी लोकसेवक श्री सतीश मुंढे पोलिस हवालदार यांनी तक्रारदाराकडून 95000/- रुपये लाच स्वीकारली. त्यानंतर आरोपी लोकसेवक सतीश मुंढे यांना सापळा पथकाची चाहूल लागताच त्यांनी स्विकारलेली 95000/- हजार लाच रक्कमेसह पळून गेले आहे. |
| 7 | गुन्हा रजिस्टर नं./ कलम/पोलीस स्टेशन/ जिल्हा,दिनांक व वेळ | आलोसे यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 चे कलम 7 व बीएनएस कलम 238 प्रमाणे शिरूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| 8 | आरोपी अटक दिनांक, वेळ | लोकसेवक सतिश मुंढे यांना सापळा कारवाईची चाहूल लागताच लाच रक्कम स्विकारुन आंधाराचा फायदा घेऊन पळुन गेला आहे. |
| 9 | सापळा अधिकारी | श्रीमती श्रीमती शैलजा शिंदे पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे मो.नं. 7722011255 |
| 10 | पर्यवेक्षण अधिकारी | श्री. सतिश वाळके, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 8087002020 |
| 11 | सापळा पथक | 1) पो. हवा.1966 प्रवीण तावरे,<br>2) पोलीस शिपाई/3296 बाळासाहेब गदादे,<br>3)चालक पोलीस अभंग ऋकेष<br>नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे. |

| | | |
|---|---|---|
| 12 | मार्गदर्शन | 1) श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.पुणे, मो.नं.-9823167154<br>2) श्री.अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक-1,ला.प्र.वि.पुणे, मो.नं. 9029030530 |
| 13 | लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा. | |

| | घटक कार्यालय | परिक्षेत्र कार्यालय | ला.प्र.वि, मुख्यालय |
|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 |
| पत्ता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालय, सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 411001 | पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे **परिक्षेत्र,सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे,** 01 | ला.प्र. वि. मुख्यालय कार्यालय, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, 400030 |
| दुरध्वनी क्रमांक, व्हॉटसअप क्रमांक | (020)26132802, व्हॉटस्ॲप क्र.9403781064, 1064 | (020) 26122134, 1064 | (022) 24921212 |
| ई- मेल आय.डी. | dyspacbpune@mahapolice.gov.in | spacbpune@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे